# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राचे सक्षमीकरण करुन विद्यापीठाचा नाशिक कॅम्पस सुरु करण्याची केलेली मागणी**

**(१) ५९३० (०८-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राचे सक्षमीकरण करुन विद्यापीठाचा नाशिक कॅम्पस सुरु करण्यासाठी शासनाने दिनांक २४ जून, २०१३ रोजी तत्वतः मंजुरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठ कॅम्पससाठी जिल्हा प्रशासनाने ६३ एकर जागा विद्यापीठाकडे हस्तांतरीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पसच्या मान्यतेची अधिसूचना निर्गमित न झाल्यामुळे या कॅम्पसचे काम प्रलंबित राहिल्यामुळे याबाबत कार्यवाही करण्याकरीता लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने उक्त विद्यापीठाच्या उपकेंद्राचे सक्षमीकरण करुन सदरील विद्यापीठाचा नाशिक येथे कॅम्पस सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२२-०७-२०१५) :** (१) होय, दि. १३-८-२०१४ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) राज्यातील विद्यापीठाच्या उपकेंद्र स्थापन करण्यासाठी निश्चित धोरण आखण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर शिफारशीनुसार सुधारित प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या पुर्नविचारार्थ सादर करण्यात येईल.

---

**खोपटा (ता.उरण जि.रायगड) प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेतील मुख्य जलवाहिनी व त्यावरील उपकरणांची दखल घेणेबाबत**

**(२) ७१६२ (०७-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपटा (ता.उरण जि.रायगड) प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेतील मुख्य जलवाहिनी व त्यावरील उपकरणांची दखल घेणेबाबत खोपटा प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना समिती यांनी दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, सिडको, द्रोणगिरी, मुख्य अभियंता, सिडको, व्यवस्थापकीय संचालक, सिडको, अधिक्षक अभियंता, सिडको, प्रकल्प अधिकारी, एनएसएसईसेड, उरण यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) खोपटा गावास खोपटा प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनाव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो. या योजनेचा रस्त्याखाली बुजलेला एअर व्हाल्व खुला करण्यात आला असून सदर जलवाहिनीची देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही अडथळा येत नाही. त्यामुळे पर्यायी जलवाहिनी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई तालुक्यातील ६९ गावांसाठी ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनेच्या कामाला शासनाची मंजूरी मिळण्याबाबत**

**(३) ९४७६ (०७-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), ता.प्र.क्र. १८५६ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील ६९ गावांसाठी ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनेच्या कामाला शासनाची मंजूरी मिळून ६ वर्षापूर्वी सुरुवात झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू योजनेसाठी वसई-विरार महानगरपालिकेकडून आवश्यक त्या जल जोडण्या प्राप्त करुन घेण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर योजनेच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

योजनेस दि. २४/०५/२००५ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. दिनांक १५.०१.२००८ च्या शुध्दीपत्रकाव्दारे फेर मान्यता प्रदान केली आहे. तद्नंतर योजनेची कामे डिसेंबर २००८ व मार्च २०१० मध्ये हाती घेण्यात आली.

(२) शासन निर्णयानुसार सदर योजनेसाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून आवश्यक त्या जल जोडण्या प्राप्त करुन घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व शासन स्तरावर पाठपुरावा सुरु आहे.

(३) भौतिकदृष्ट्या योजनेची कामे ९८% पुर्ण झाली आहेत. योजना कार्यान्वित करण्यासाठी वसई-विरार महानगरपालिकेने आवश्यक जल जोडण्या व्दारे पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील व सांगली जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या योजना निधी अभावी बंद व प्रलंबित असल्याबाबत

**(४) ९६५६ (०७-०४-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या ५० टक्के योजना गत १५ वर्षापासून निधी अभावी बंद पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सांगली जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडील शेकडो पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील पिण्याच्या पाण्याच्या योजनेस निधी उपलब्ध करून न देण्याची व प्रश्न भाग (२) मधील योजना प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने निधी उपलब्ध असतानाही सदर योजना अपुर्ण अवस्थेत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०८-२०१५) :** (१) आणि (२) हे खरे नाही. तसेच सांगली जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाकडील ९४७ स्वतंत्र योजनांपैकी ६३ योजना मागील ३ ते ५ वर्षापासून प्रलंबित असून प्रादेशिक योजनांपैकी जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणा-या १७

योजनांपैकी २ योजना मागणी अभावी बंद असून ३ योजना आवश्यकतेनुसार टंचाई कालावधीत मागणीनुसार हंगामी चालविण्यात येतात.

(३) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना राज्य शासनाकडून वेळोवळी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिली जातो.

सांगली जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाकडील कोणतीही योजना प्रलंबित असल्याची सर्वसाधारण कारणे पुढील प्रमाणे आहेत.

(१) सुधारीत मंजुरीकरीता योजना शासनाकडे सादर केल्याने.

(२) तक्रारीमुळे बंद.

(३) कामात अनियमितता झाल्याने (पोलीस गुन्हे दाखल केलेल्या.)

(४) निधीचा अपहार झाल्याने.

(५) उंच टाकीचे काम न झाल्याने योजना रखडणे.

(६) शासनास पैसे परत केल्याने.

(७) ग्रामपाणी पुरवठा स्वच्छता समितीने पुढील काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने

(४) प्रलंबित योजना पुर्ण करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून, प्रलंबित योजनांपैकी २७ योजनांची कामे प्रगतीपथावर असून त्या ऑगस्ट २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे मौ.तांदूळवाडी व माळेवाडी ता.वाळवा जि.सांगली येथील पाणी पुरवठा योजनांसदर्भात नोंदविलेल्या कामांमध्ये फरक आढळून आल्याने संबंधिताकडून रक्कम वसूल करण्यात आली असून, शाखा अभियंता यांना निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील कॅन्सर रुग्णालयात कर्मचारी व डॉक्टरांच्या रिक्त जागा भरण्याबाबत**

**(५) १२१८९ (०९-०४-२०१५). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील कॅन्सर रुग्णालयात वैद्यकीय तज्ञ, तंत्रज्ञ व कर्मचारी यांच्या मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त असल्याने गरीब व गरजू रुग्णांची गैरसोय होत असून सदरील रुग्णांना उपचारासाठी मुंबई वा अन्य ठिकाणी जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील एम.आर.आय. व सीटी स्कॅनकरीता गरजू व गरीब रुग्णांना एक ते दिड महिन्यानंतरची तारीख दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. सध्या कार्यरत तज्ञ/तंत्रज्ञ यांचेकडून रुग्णसेवा प्राथम्यक्रमाने दिली जात आहे. तसेच रुग्णांना या रुग्णालयातून पुढील उपचारांसाठी अन्यत्र पाठविण्यात येत नाही.

(३) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही नियमानुसार सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री.क्षेत्र नृसिंहवाडी (जि.कोल्हापूर) येथील कृष्णा नदी स्वच्छ करण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत**

**(६) १२२८८ (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.क्षेत्र नृसिंहवाडी (जि.कोल्हापूर) येथील कृष्णा नदी प्रदुषित झाली असून नदीचे पाणी प्रवाहित करण्याची तसेच उपाययोजना राबविण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी व भाविकांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान संबधितांकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार नदी स्वच्छ करण्याकरीता कोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत, या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदरचे काम केव्हा पर्यंत पूर्ण होणे शासनास अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१७-०८-२०१५) :** (१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोंकण समुद्र किना-यावर सीआरझेडच्या अटी शिथिल करण्यास केंद्रीय समितीने अनुकुलता दर्शविल्याबाबत**

**(७) १२८१८ (०६-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण समुद्र किना-यावर सीआरझेडच्या अटी शिथिल करण्यास केंद्रीय समितीने अनुकुलता दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण किनारपट्टीवरील १०० निसर्ग स्थळांची निवड करण्याबाबत राज्य शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने कोकण समुद्र किनारपट्टीवरील कोणती स्थळे निश्चित करुन केंद्रीय पर्यावरण समितीकडे पाठविली आहेत व त्यास केंद्रीय पर्यावरण समितीने मंजूरी दिली आहे काय,

(४) अद्याप केंद्रीय पर्यावरण समितीकडून मंजूरी प्राप्त झाली नसल्यास, राज्य शासनाकडून करावयाच्या पुराव्याची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम (३१-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) महाराष्ट्र पर्यटन महामंडळामार्फत सागरी किना-यावर सुविधा निर्माण करण्यासाठी २२ स्थळांची निवड करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील प्राप्त झालेल्या ०५ प्रस्तावांपैकी ०४ प्रस्तावास एम.सी.झेड.एम.ए.ने.मंजूरी दिली असून उर्वरित एका प्रस्तावानुषंगाने काही मुद्दयांबाबतची माहिती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून मागविण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यातील प्राप्त झालेल्या ०१ प्रस्तावास एम.सी.झेड एम.ए.ने मंजूरी दिली आली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्राप्त झालेल्या ०३ प्रस्तावास एम.सी.झेड एम.ए.मार्फत मंजूरी प्रदान करण्यांत आली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातून एकही प्रस्ताव मंजूरीसाठी एम.सी.झेड.एम.ए.कडे प्राप्त झालेला नाही.

---

## अकोला जिल्ह्यात शिक्षकांची संख्या वाढवून अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर भर देण्याबाबत

**(८) १३४९२ (१०-०४-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असताना अकोला जिल्ह्यातील सुमारे ८ हजार अपंग विद्यार्थ्यांचा भार केवळ ५० मोबाईल टिचर्सवर असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नियमाप्रमाणे एका मोबाईल टिचरने दहा विद्यार्थ्यांना शिकवणे अपेक्षित आहे मात्र हजारो विद्यार्थी आणि ५० शिक्षक असल्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांकडे परिपूर्ण लक्ष देणे शिक्षकांना कठिण जात असल्याने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करीत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे. विशेष गरज असणा-या बालकांना वेगळ्या शाळेमध्ये न ठेवता नियमित वर्गातच वर्ग शिक्षकामार्फत अध्यापन केले जाते. शिवाय अकोला जिल्ह्यातील वर्ग शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी ५१ विशेष शिक्षक आणि प्रत्येक तालुकयास २ याप्रमाणे ८ तालुक्यासाठी १६ विषयतज्ज्ञ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही. विशेष गरज असणा-या बालकांना वेगळ्या शाळेमध्ये न ठेवता नियमित वर्गातच वर्ग शिक्षकामार्फत अध्यापन केले जाते त्यामुळे समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत १० विद्यार्थ्यांसाठी १ शिक्षक ही संकल्पना नसून ज्यावेळी वर्गशिक्षकांना अध्यापनासाठी मार्गदर्शन लागते त्यासाठी विशेष शिक्षक मार्फत मार्गदर्शन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विद्यापीठ परिक्षा मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(९) १३६८० (०८-०४-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलगुरुंवरील परीक्षांचे दडपण दुर व्हावे याकरीता राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षांचे आयोजन करणारे विद्यापीठ परीक्षा मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०७-२०१५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठातील पदनिर्मितीस मंजुरी मिळणेसाठीचा प्रस्ताव**

**(१०) १५४०० (०९-०४-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठातील पदनिर्मितीस मंजुरी मिळणेसाठीचा प्रस्ताव विद्यापीठाने दिनांक ८ जानेवारी, २०१४ रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये एकूण ८६० पदांची आवश्यकता आहे व त्यापैकी शिक्षकेत्तर पदे, शिक्षक व तांत्रिक यांची किती पदे भरावयाची आहे,

(३) उक्त पदनिर्मितीस मान्यता देवून सदरील पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-०७-२०१५) :** (१) व (२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पदनिर्मितीबाबत सादर केलेला प्रस्ताव कालबाहय झाल्याने दिनांक २६/११/२०१४ च्या पत्रान्वये

रद्द करण्यात आला असून, सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत विद्यापीठास कळविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून अद्याप परिपूर्ण सुधारीत प्रस्ताव अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या काही अभियांत्रिकी महाविद्यालयांची मान्यता आणि संलग्नतेबाबत**

**(११) १५६४९ (०९-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे माहिती अधिकारांतर्गत काही अभियांत्रिकी महाविद्यालयांची मान्यता आणि संलग्नतेबाबतचे तपशिल मागविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या अनुषंगाने विद्यापीठाने मान्यता दिलेल्या महाविद्यालयांबाबत स्थानिक चौकशी समितीचा अहवाल पुणे विद्यापीठाकडे नसल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे महाविद्यालयांच्या मान्यतेच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचेही दिसून आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२२-०७-२०१५) :**(१) होय
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील शिधापत्रिकांधारकांना शिधापत्रिका मिळाले नसल्याचे**

**(१२) १६८३५ (३१-०७-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील एकंदर २२ लाख ६७ हजार ६६४ शिधापत्रिकांपैकी १७ लाख ९० हजार ८६२ शिधापत्रिकांधारकांना आवश्यक प्रपत्र मिळाले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सर्वत्र बायोमेट्रिक रेशन प्रणाली लागू होणार असून त्यामुळे राष्ट्रीय

अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ लागू झाला आहे त्या अनुषंगाने आवश्यक पुढील कार्यवाही सुरु असूनही अद्यापही प्रश्न भाग (१) मधील उर्वरित शिधापत्रिकाधारकांना आवश्यक प्रपत्र मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील तसेच माहूर तालुक्यातील ऊस तोडणीसाठी स्थलांतरीत मजूरांचे धान्य वितरीत केल्याबाबत**

**(१३) १७११८ (३१-०७-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील तसेच माहूर तालुक्यातील ग्रामीण भागातील हजारो मजुर दिवाळीपूर्वीच ऊस तोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतरीत झाले असल्यामुळे गत ३/४ महिन्यापासून मजुर गावात नसले तरीसुध्दा त्यांच्या नावावर अद्यापही रास्तभाव दुकानात धान्य व रॉकेल येत असून तरी त्यांचे धान्य व रॉकेल मात्र नियमित रास्तभाव दुकानातून उचलले जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकाराला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने गावात पाहणी करून नेमके किती मजूर स्थलांतरीत झाले ते परत कधी येणार याची माहिती मिळवून धान्याचे नियमन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०९-२०१५) :** (१) नाही, हे खरे नाही.

या संदर्भातील तक्रार प्राप्त झाली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषदेच्या शौचालय बांधकामाचे अनुदान निधीअभावी लाभार्थ्यांना वाटप झाले नसल्याबाबत**

**(१४) १७१२६ (३१-०७-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात ६५ हजार शौचालयाची बांधकामे पूर्ण झाली आहेत, प्रत्येक १२ हजार रुपयांचे अनुदान याप्रमाणे अनुदानाची रक्कम ७८ कोटी रुपयांच्यावर पोहचली असली तरी

प्रशासनाच्या वतीने आजपर्यंत केवळ २५ कोटी रुपयेच लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहेत, उर्वरित ५३ कोटी रुपयांचे अनुदान वाटप करणे थकित असून केंद्र व राज्य शासनाकडून निधीच उपलब्ध झालेला नसल्याचे माहे मार्च, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हा परिषदेचे शौचालय बांधकाम लाभार्थ्यांच्या अनुदान वाटपासाठी ५२ कोटी रुपयांची मागणी राज्य शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जिल्हा परिषदेच्या मागणीवर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०८-२०१५) :** (१) केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दि. २ ऑक्टोबर, २०१४ पासून शौचालय बांधकामाचे अनुदान सुधारित करुन रु. १२,००० इतके करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत एकुण १३०९ ग्रामपंचायती असून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ५५,५७५ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. तसेच मार्च २०१५ नंतर आजपावेतो आणखी २७००० शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. अशाप्रकारे जिल्ह्यात एकूण ८२,५७५ शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. यापैकी २९००० लाभार्थ्यांना रु. ३५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच उर्वरित ५३,५७५ लाभार्थ्यांना शौचालयाचे अनुदान रु. ६४ कोटीचे वितरण अदयापि करावयाचे आहे.

(२) नांदेड जिल्हा परिषदेने सन २०१५-१६ या वर्षात रु. ६४.०० कोटी एवढ्या निधीची मागणी केली आहे.

(३) सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात दि. २ ऑक्टोबर, २०१४ पासूनचे शौचालये बांधकामासाठीचे सुधारित अनुदान विचारात घेता, केंद्र शासनाकडून एकूण रु. ६५५.०२ कोटी इतके अनुदान प्राप्त होणे अपेक्षित होते परंतू, प्रत्यक्षात रु. २३६.११ कोटी इतकेच अनुदान प्राप्त झालेले आहे. यास्तव मागणीनुसार पूर्ण निधी जिल्हा परिषदांना वितरीत करणे शक्य झाले नाही. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नांदेड जिल्हा परिषदेस केंद्र हिश्श्यासाठी रु.१२.७८६१ कोटी व राज्य हिश्श्यापोटी रु. २४.६२५५ कोटी अशाप्रकारे एकूण रु. ३७.४११६ कोटी एवढ्या निधीचे वितरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्वस्त धान्य दुकाने (रेशनिंग) महिला बचत गटांना चालविण्यासाठी देण्याची मागणी

**(१५) १७८१६ (३१-०७-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत स्वस्त धान्य दुकान (रेशनिंग) चालविण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना वर्षभरात किमान ५० हजारांची लाच दयावी लागत असल्याचा आरोप मुंबई रेशनिंग कार्डधारक

संघटनेने केला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, उक्त दुकानदारांना तुटपुंजे कमिशन मिळत असताना गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना वर्षाकाठी ५० हजारांचा हप्ता देणे कसे परवडते हा पैसा दुकानदार काळाबाजार करुन कमवतात असाही आरोप संबधित संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रेशनिंग विभागातील गैरकारभार रोखण्यासाठी महिला बचत गटांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी शिधावाटप दुकाने चालविण्यास देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०९-२०१५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

या संदर्भातील बातमी दिनांक १७ एप्रिल, २०१५ च्या दैनिक लोकमत व दिनांक २१ एप्रिल, २०१५ च्या दैनिक सकाळ मध्ये प्रसिध्द झाली होती.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या अन्नधान्याचे वितरण कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराशिवाय शिधापत्रिकाधारकांना नियमितपणे उपलब्ध व्हावे, या करीता राज्यातील प्रत्येक रास्तभाव दुकानाच्या वर्षातून किमान दोनदा व सहा महिन्यातून किमान एकदा नियमित तपासण्या करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १२ जानेवारी, २०१२ अन्वये सर्व संबधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

महिला बचत गटाना आर्थिकदृष्टया सक्षम करणासाठी शिधावाटप दुकाने महिला स्वयं सहायता बचत गटांना प्राधान्याने मंजूर करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर, २००७ नुसार कार्यवाही करण्यात येते.

---

## दुर्गवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील रास्तभाव धान्य दुकान बंद असल्याबाबत

**(१६) १८३७१ (३१-०७-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुर्गवाडी (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) येथील रास्तभाव धान्य दुकान गत ६ महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रास्त दराचे धान्य दुकान बंद असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर दुकान बंद राहण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच सदर दुकान सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०९-२०१५) :** (१), (२) व (३) मौ. दुर्गवाडी खुर्द ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथील रास्तभाव दुकानदाराने राजीनामा दिला असल्याने, सदर दुकान दुर्गवाडी ब्रुदक ता.चिपळूण येथील दुकानास जोडण्यात आले. तथापि, सदर दुकानदारांची कौटुंबिक अडचणीस्तव ते अतिरिक्त धान्याची उचल करु शकत नाही असे कळविले होते. त्यामुळे मौ.दुर्गवाडी खुर्द येथील दुकान मौ.फुरुस येथील रास्तभाव दुकानास जोडण्यात आले असून शिधापत्रिकाधारकांना माहे जून, २०१५ पासून सदर दुकानातून नियमितपणे धान्याचे वितरण सुरु आहे.

तसेच दुर्गवाडी खुर्द येथील शिधापत्रिकाधारकांना माहे डिसेंबर, २०१४ ते मे, २०१५ या कालावधीतील धान्याचे वितरण न झाल्याने आता त्या धान्याचे वितरण करण्याबाबत दिनांक ६ जुलै, २०१५ च्या आदेशान्वये मौ. फुरुस येथील रास्तभाव दुकानदार यांनी उपरोक्त नमूद सहा महिन्यांच्या कालावधीच्या धान्याची उचल केलेली आहे. त्याप्रमाणे धान्याचे विरतण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदूर्ग) पर्यावरणीयदृष्टया संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित झाल्यानंतर नगरपरिषद व नागरिकांना आलेल्या अडचणींचा वस्तुस्थितीदर्शक अहवालाबाबत**

**(१७) १९५१४ (३१-०७-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण परिसर सीआरझेड सन २०११ या कायद्यांतर्गत क्रिटिकल व्हर्नेबल कोस्टल एरियाज म्हणजेच पर्यावरणीयदृष्टया संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित झाल्यानंतर गत चार वर्षात मालवण नगरपरिषद व नागरिकांना आलेल्या अडचणींचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल पर्यावरण विभागाकडे सादर करण्याचे आदेश माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई येथे झालेल्या बैठकीत मा.पर्यावरण मंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मालवण शहर व परिसरातील प्रमुख व्यवसाय व नागरकिंच्या उपजिविकेचे साधन म्हणून मासेमारी हा व्यवसाय असल्याने व त्यामुळे नागरिकांची निवासस्थाने व बाजारपेठ समुद्रकिनाऱ्यालगत असल्याने नागरिकांचे जीवनमान, सार्वजनिक हित व मालवणची अर्थव्यवस्था यांचा विचार करता मालवण शहराचा समावेश सीआरझेड-II या वर्गवारीत करुन विकसित झालेले मालवण शहराचे क्षेत्र सी.व्ही. सी.ए. (अतिसंवेदनशील पर्यावरण क्षेत्र) या वर्गवारीतून वगळण्या संदर्भात मालवण नगरपरिषदेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडे पाठविण्यात

आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकरूख (जि.सोलापूर) तलावामधील कमी पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(१८) १९५६३ (२९-०७-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकरूख (जि.सोलापूर) तलावामध्ये अत्यंत कमी पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण व शहरातील पाणी पुरवठा पूर्णपणे बंद झाल्यामुळे २ ते २.५० लाख नागरिक पिण्याच्या पाण्यापासून वंचित असल्याचे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकरूख उपसा सिंचन योजनेचे काम ८० ते ८५ टक्के काम पूर्ण झाल्याने कारंबा कालव्यातून उजनीचे पाणी सोडून तलावामध्ये साठवणूक केल्यास पाण्याची समस्या मिटणार आहे.या मागणी बाबत जि.प.सदस्य यांनी मा.पाटबंधारे मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०८-२०१५) :** (१) अंशतः खरे नाही.

(२) होय.

(३) दि.०३ फेब्रुवारी, २०१५ च्या बैठकीत मा.मंत्री जलसंपदा यांनी कारंबा पंपगृह परिचालनाचा व देखभाल दुरुस्तीचा खर्च करणेसाठीचा महापालिकेचा ठराव घ्यावा तसेच, भीमा (उजनी) प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावामध्ये कारंबा पंपगृहाचा अंतर्भाव करुन सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व मान्यता मिळाल्यानंतर कारंबा पंपगृहाचे बांधकाम करावे, असे निर्देश दिले आहेत. तथापि, अद्याप महापालिकेकडून ठराव अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुस्लीम समाजाच्या रमजान ईद, बकरी ईद या सणाकरिता जादा साखरेचा कोटा देण्याबाबत**

**(१९) १९५६६ (३१-०७-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सणवार असतात त्यावेळी शासनाकडून १६० ग्रॅम साखर प्रति व्यक्ती जादा देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे

खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याच धर्तीवर मुस्लीम समाजाच्या रमजान ईद, बकरी ईद या सणाकरिता जादा साखरेचा १६० ग्रॅम प्रति व्यक्ती कोटा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०९-२०१५) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सणासुदीच्या नियतनामध्ये गणपती व दिवाळी या सणांकरीता नेहमीच्या मासिक नियतनाव्यतिरिक्त १६० ग्रॅम साखर प्रति व्यक्ती दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय रेशनकार्डधारक लाभार्थ्यांना देण्यात येते.

---

**लातूर व रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील अन्न सुरक्षा योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांची नावे समाविष्ट करण्याबाबत**

**(२०) २१०३४ (३१-०७-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर व रेणापूर (जि.लातुर) तालुक्यातील शासनाच्या अन्न सुरक्षा योजनेमध्ये अनेक पात्र लाभार्थ्यांची नावे समाविष्ट नसल्याने सदर योजनेत पात्र असतानाही वंचीत असलेल्या सर्व कुटूंबाची नावे समाविष्ट करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लातूर-रेणापूर तालुका आढावा बैठकीत तहसील प्रशासनास सूचना केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजनेपासून वंचित असलेल्या पात्र लाभार्थ्यांची नावे अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०९-२०१५) :** (१) होय.
(२) रेणापूर व लातूर या तालुक्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे. सदर तालुक्यांतील प्राप्त तक्रारी तहसिलदार स्तरावर निकाली काढण्यात येऊन पात्र लाभार्थ्यांची नावे योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. अपात्र व्यक्तींना लाभ दिला जाणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर व रेणापूर (जि.लातूर) तालुक्यामधील गावातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार नविन स्वस्त धान्य दुकाने मंजूर करण्याबाबत

**(२१) २१०४५ (३१-०७-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर व रेणापूर (जि.लातूर) तालुक्यात शासन निर्णयानुसार गावनिहाय स्वस्त धान्य दुकाने ही गावातील लोकसंख्येच्या प्रमाणाच्या निकषानुसार मंजूर नसल्याकारणाने सदर शासन निर्णयानुसार नविन स्वस्त धान्य दुकाने मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लातूर व रेणापूर तालुक्याच्या संयुक्त आढावा बैठकीत तहसीलदार लातूर व रेणापूर यांचेकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात लातूर व रेणापूर तालुक्यात किती नवीन स्वस्त धान्य दुकान मंजूर करणे आवश्यक आहे,

(३) असल्यास, सदरील नविन स्वस्त धान्य दुकानांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे,

(२), (३) व (४) रास्तभाव दुकानांचा आढावा घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## पळस्पे (ता.पनवेल, जि.रायगड) गावाला जास्त आकाराची पाईप लाईन टाकण्याची मागणी

**(२२) २१३३१ (२९-०७-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळस्पे (ता.पनवेल, जि.रायगड) गावाला एमआयडीसीच्या पाईपलाईन मार्फत पाणीपुरवठा करण्यासाठी जोडण्या देण्यात आल्या असून या गावाला पाणीपुरवठा होण्यासाठी सध्या केवळ २ इंच आकाराची पाईपलाईन टाकण्यात आली असून वाढत्या लोकसंख्येच्या मानाने नविन जोडण्या अधिक झाल्या असल्याने पाणीपुरवठा कमी दाबाने होऊ लागला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांची अपु-या पाणीपुरवठ्यामुळे गैरसोय होऊ नये म्हणून जास्त आकाराची पाईप लाईनची मागणी संबंधित ग्रामपंचायतीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागात पुरेसा पाणी पुरवठा होण्यासाठी ग्रामपंचायतीने केलेल्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३१-०८-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ग्रामपंचायतीच्या मागणी प्रमाणे सदर गावास राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रु. १,६७,६२,८३९/- ची नळ पाणी पुरवठा योजना डिसेंबर, २०१४ मध्ये मंजूर करणेत आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवखडा-तपाळ (ता.नागभिड, जि.चंद्रपुर) पाणी पुरवठा योजनेच्या एक्सप्रेस फीडरचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) २१४०० (२९-०७-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर (ता.नागभीड) जिल्ह्यातील जिल्हा परीषद चंद्रपूर अंतर्गत नवखडा-तपाळ पाणी पुरवठा योजनेचे (water treatment plant) राज्य शासनाने एक्सप्रेस फीडर मंजुर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एक्सप्रेस फीडरची एकूण डिमांड रक्कम ४३ लक्ष ५७ हजार रुपये खर्चाचे अंदाजे मंजूर अंदाजपत्रक खर्चापैकी जिल्हा परिषद चंद्रपूर द्वारा महावितरण विभागास देखभाल दुरुस्ती १.३ टक्के रक्कमेचा भरणा करणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ९ मे २०१४ रोजी वा त्यासुमारास या संदर्भात अधिक्षक अभियंता महावितरण, गडचिरोली यांनी कार्यकारी अभियंता महावितरण, ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) यांना पत्रव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंदाजे ५६ हजार रुपयांच्या रक्कमेचा महावितरणाला जिल्हा परीषद चंद्रपूर कडून भरणा न झाल्यामुळे नवखडा-तपाळ या १७ गावांना पुरवठा करणा-या पिण्याच्या पाण्याच्या योजनेच्या एक्सप्रेस फीडर चे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, तथापि, एक्सप्रेस फीडरच्या कामाची मूळ अंदाजित किंमत रु.४३.५७ लक्ष होती. परंतू सदर कामासाठी रु.६०,९३,३८४/- इतक्या किंमतीचे सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्याने, महावितरण विभागास १.३% रकमेचा भरणा करणे आवश्यक आहे. तथापि, सदर खर्च हा सुपरव्हिजन शुल्काचा असून, एकूण रक्कम रु. ६१.५३,६१७/- महावितरण विभागास भरणे अनिवार्य आहे.
(३) नाही.
(४) व (५) हे खरे नाही.

नवखडा-तपाळ पाणी पुरवठा योजनेच्या एक्सप्रेस फीडरच्या मूळ अंदाजित रकमेवरील सुपरव्हिजन शुल्क रु. ५६,४६२/- इतके आहे. तथापि, सदर कामाची सुधारित किंमत रु.

६०,९३,३८४/- चे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. ब्रम्हपूरी यांचेकडून प्राप्त झाल्याने त्यानुसार महावितरण विभागास सुपरव्हिजन शुल्क १.३ % रकमेसह एकूण रक्कम रु. ६१,५३,६१७/- भरणे अनिवार्य आहे. तथापि, सदर रकमेची तरतूद जिल्हा परिषद, चंद्रपूरकडे उपलब्ध नसल्यामुळे सदर रकमेची मागणी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे करण्यात आली आहे. सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर सदर पाणी पुरवठा योजनेच्या एक्सप्रेस फीडरचे काम करण्यात येईल.

---

**अकोला जिल्हयातील तसेच मलकापूर (जि.अकोला) येथील महाजल योजनेंतर्गत पाण्याची टाकी बांधकामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२४) २१४३५ (२९-०७-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.अकोला) येथील महाजल योजनेंतर्गत पाण्याची टाकी बांधकाम प्रकरणी तसेच अतिशय मोठया प्रमाणात होत असलेल्या पाण्याच्या गळतीबाबत नागरिकांच्या आरोग्याला अपायकारक असल्याने जनआंदोलन उभारण्याचा इशारा विविध संघटना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाण्याची टाकी बांधतेवेळी मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे तसेच पाणी फिल्टर होऊन मिळत नाही अशाही तक्रारी झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर जिल्हयातील २० गावांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने सन २००८-०९ मध्ये महाजल योजनेतर्फे रूपये ३० कोटी खर्चुन बांधलेल्या प्रशस्त पाण्याच्या टाक्यांमध्ये एकही थेंब नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठिकाणी तांत्रिक अडचण आहे असे दर्शवून संबधित अधिकाऱ्यांकडून गावकऱ्यांना पाणी पुरवठा करण्यास दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करुन नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच शुध्द पाणीपुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सन २००८-०९ मध्ये अकोला जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत एकूण ३ गावात “महाजल” योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी,२ गावांमध्ये थेट पाणी पुरवठा व १ गांवा मध्ये उंचटाकीचे बांधकाम प्रस्तावित

होते. त्यानुसार सदर तीनही गांवातील नळपाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून २ गावांमध्ये थेट पाणी पुरवठा व १ गावांत उंचटाकी मधून योजनेचा पाणी पुरवठा सुरु आहे.

सदर ३ योजनांची एकूण अंदाजित किंमत रु.६६.१८ लक्ष असून, सदर योजनेवर रु.६४.४० लक्ष रक्कम खर्च झाली आहे.

(५) हे खरे नाही.

(६) सहायक भु-वैज्ञानिक यांनी जून महिन्यातील तलावातील पाणी पातळी गृहीत धरुन कनेक्टींग मेल ट्रेंच गॅलरी व तीन तपासणी विहिरी घेण्याचे प्रस्तावित केल्यानुसार ट्रेन्च गॅलरीमधून येणारे पाणी हे फिल्टर होवूनच येत असल्यामुळे विहिरीमध्ये दुषित पाणी येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोरगांव व राजेगांव (ता.लाखनी,जि.भंडारा) येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजना विद्‌युत जोडणी अभावी रखडली असल्याबाबत**

**(२५) २१५२१ (२९-०७-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)मोरगांव व राजेगांव (ता.लाखनी,जि.भंडारा) येथील सुमारे ३००० नागरिकांना पिण्याचे पाणी पुरविणारी ग्रामीण पाणी पुरवठा योजना विद्‌युत जोडणी अभावी रखडली असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्याचे, सदर नळयोजनेला विद्‌युत पुरवठा करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३१-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मोरगाव व राजेगाव या योजनांना विद्‌युत पुरवठा करण्यासाठी डिमांड प्राप्त झाली असून, ग्रामपंचायतीने थकीत असलेले विद्‌युत देयक व नवी जोडणीसाठी लागणा-या रक्कमेचा भरणा विद्‌युत वितरण कंपनीकडे केला असून, मोरगावचा विद्‌युत पुरवठा चालू झाला आहे.

राजेगांवचा विद्‌युत पुरवठा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुसरूंड (ता.पाटण,जि.सातारा) गांवामध्ये मंजुर नळ पाणी पुरवठा योजनेस ग्रामपंचायत पाणी पुरवठा समिती ठराव देत नसलेबाबत**

**(२६) २१९०० (२९-०७-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुसरूंड (ता.पाटण,जि.सातारा) या गावाकरीता शासनाने पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे काम मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या योजनांचे काम पूर्ण करण्याकरिता ग्रामपंचायत पाणी पुरवठा समितीचा ठराव आवश्यक आहे व सदरचा ठराव मिळवून पिण्याच्या पाण्याच्या योजनेचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याकरिता संबंधित गावातील ग्रामस्थ ग्रामपंचायत कुसरूंडच्या पाणी पुरवठा समितीकडे ठरावाची मागणी करुनही ग्रामपंचायत पाणी पुरवठा समिती ठराव देत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात गटविकास अधिकारी, पाटण यांच्याकडे संबधित गांवातील ग्रामस्थांनी तक्रार केल्यानंतर गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाटण यांनी सरपंच व ग्रामसेवक यांना दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी पत्र पाठवून सदरचा ठराव देणेबाबत आदेश दिले असूनही सदरचा ठराव दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०९-२०१५) :** (१) होय, शासना मार्फत भारत निर्माण कार्यक्रमाखाली सन २००८-०९ साली नळ पाणी पुरवठा योजना मंजूर केली आहे.
(२) हे खरे नाही.
सदर नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केलेली असून दि.०५.०२.२०१३ पासून पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच कुसरुंड (पाटीलवस्ती) नळ पाणी पुरवठा योजनेस दि.२२.०२.२०१४ च्या ग्रामसभा ठरावाद्वारे ग्रामपंचायतीमार्फत शिफारस प्राप्त झाली असून सदर प्रस्तावित योजनेतील दाबनलिका, वितरण व्यवस्था ही कामे १०० टक्के पूर्ण व साठवण टाकीचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे बिबवेवाडी परिमंडळ “ह” अंतर्गत ऑनलाईन रेशनिंग कार्डसाठीचा फॅार्म दुकानदार जास्त दराने विकत असल्याबाबत**

**(२७) २२३२१ (३१-०७-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिबवेवाडी (जि.पुणे) परिमंडळ “ह” अंतर्गत ऑनलाईन रेशनिंग कार्डसाठीचा नव्वद पैशांना मिळणारा फॅार्म दुकानदार पाच रुपयांपासून ते वीस रुपयांपर्यंत विकत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुटुंबातील सर्वांचे आधार कार्ड असल्याशिवाय नागरीकांना शिधा पत्रिका अर्ज दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे का, त्यानुषंगाने परिमंडळ “ह” अंतर्गत नागरीकांची होणारी लुट थांबविण्याकरीता कोणती उपाययोजना करण्यात आली व

संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नगरधन (ता.रामटेक,जि.नागपूर) येथील शिखर समितीच्या**
**अध्यक्षा यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(२८) २२८१७ (३१-०७-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरधन प्रादेशिक (ता.रामटेक,जि.नागपूर) पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्तीचे काम पाहण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना देऊनही दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास सदर योजनेच्या शिखर समितीच्या अध्यक्षांनी फिल्टर प्लॅन्ट बंद ठेवले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी समितीच्या अध्यक्षा गायकवाड यांच्यावर कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्यांनी लेखी निवेदनाद्‌वारे संबंधित विभागाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,त्यानुसार श्रीमती गायकवाड यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कारवाई करण्याबाबतचे कोणतेही निवेदन जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे प्राप्त झाले नाही. त्यामुळे चौकशी करुन कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येसंबा (ता.मौदा, जि.नागपूर) या गावात विहिर**
**बांधण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) २२८२० (२९-०७-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येसंबा (ता.मौदा,जि.नागपूर) या गावाला बोअरवेलमधुन गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने सदर गावातील लोकांना पाण्याकरिता रेल्वेस्थानकांवर जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, मे,

२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या बोअरवेलचे पाणी पिण्यास अयोग्य असून त्या पाण्याची अद्यापही तपासणी करण्यात आलेली नाही तसेच सदर गावात विहिर बांधण्याचा प्रस्ताव गत तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

येसंबा गावाकरीता सन १९९६ मध्ये स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आलेली असून सध्या गावापासून २ कि.मी. अंतरावरील नाल्यावर असलेल्या पुरवठा विहिरीव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(२) नाही.

येसंबा स्टेशन टोली करिता नविन विंधन विहिर माहे जून २०१५ मध्ये करण्यात आलेली असून सदर विंधन विहिरीचे पाणी तपासणी करीता पाठविण्याबाबत गट ग्रामपंचायत येसंबा यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) येसंबा हे गांव सन २०१५ चे टंचाई आराखड्यात समाविष्ट होते. टंचाई अंतर्गत शासनामार्फत उर्ध्वनलिका दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले असून पाणी पुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली येथील काळी खण परिसर पर्यटन केंद्र होणेबाबत**

**(३०) २३३७२ (३१-०७-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथील काळीखण परिसर राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत सुशोभिकरणाचा प्रस्ताव शास्त्रज्ञ, राष्ट्रीय नदी/सरोवर संवर्धन संचालनालय, पर्यावरण व वन विभाग, भारत सरकार यांच्याकडे दिनांक १३ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या मंजुरी बाबत शासनाने कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम (०१-०९-२०१५) :**(१) होय.

सांगली येथील काळीखण तलाव संवर्धनाचा प्रस्ताव राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेंतर्गत समाविष्ट करण्यासाठी राज्य शासनामार्फत दि. १३ जानेवारी, २०१० रोजी केंद्र शासनास पाठविण्यात आलेला आहे.
(२) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत प्रस्तावासंबंधित विचारणा करण्यात येणारी

अधिकची माहिती वेळोवेळी दि. ५ मार्च, २०१०, २१ सप्टेंबर, २०१०, ८ फेब्रुवारी, २०११, ३ जून, २०११, २३ ऑगस्ट, २०११, ३१ जानेवारी, २०१२, ३० ऑक्टोबर, २०१२, १८ मे, २०१३, ३ ऑगस्ट, २०१३, २१ जानेवारी, २०१४, १३ मार्च, २०१४ व ३ जून, २०१५ रोजीच्या पत्रांन्वये सादर करण्यात आलेली आहे.

(३) सद्य:स्थितीत प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे मंजूरीस्तव प्रलंबित आहे.

---

**तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील पाणी पुरवठा योजनेचा वापर केला नसल्याबाबत**

**(३१) २३७४९ (२९-०७-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव (जि.सांगली) तालुक्यात माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनेच्या आवर्धनावरील रु २२.२१ कोटी इतका खर्च करुन बांधण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोट्यावधी रुपये खर्च करुन सदर योजना मागील सहा वर्षापासून न वापरल्यामुळे सदरचा कोट्यावधी रुपयांचा खर्च वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची योजना न वापरण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०९-२०१५) :** (१) नाही.

रुपये २२.२१ कोटी इतक्या किंमतीची कोणतीही नळपाणी पुरवठा योजना राबविण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

प्रादेशिक पुरक सावळज (कृष्णा नदी उद्भव) या रुपये २५.२० कोटी इतक्या ढोबळ किंमतीची नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकारणामार्फत पुर्ण करुन मे, २००४ मध्ये कार्यान्वित करुन दि.०५.०३.२०१३ रोजी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ प्रादेशिक सावळज तासगाव, प्रादेशिक पेड, ता.तासगाव व प्रादेशिक बाणुरगड व जाधववाडी ता. खानापूर व आटपाडी यांना होतो.

(३) सध्या पाण्याची मागणी नसल्यामुळे ही योजना बंद ठेवण्यात आली आहे.

---

**राज्यात नाशिक जिल्ह्यासह रॉकेलची झालेली कपात**

**(३२) २३७६० (०६-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नाशिक जिल्ह्यासह, नवी मुंबई, पाचोरा-भडगांव (जि.जळगांव), संगमेश्वर (जि.रत्नागिरी) माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने रॉकेल

कोट्यामध्ये कपात केल्यानंतर पुन्हा माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान कपात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे आगामी तीन महिने सुमारे सव्वा लाख लिटर रॉकेल कमी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रॉकेल कोट्यामध्ये कपात करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्याच्या रॉकेलच्या कोट्यात वाढ करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०९-२०१५) :**(१), (२) व (३) केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्याच्या केरोसिन नियतनात सुमारे १९% इतकी कपात केली असून माहे एप्रिल, २०१५ पासून सुमारे ५% इतकी वाढ करुन राज्यास केरोसिन नियतन उपलब्ध करुन दिले आहे. उपलब्धतेच्या प्रमाणानुसारच सर्व जिल्ह्यांना केरोसिन नियतन मंजूर करण्यात आले आहे.

यापुढील कालावधीतही केंद्र शासनाकडून राज्यास ज्या प्रमाणात केरोसिन उपलब्ध होईल त्याच प्रमाणात सर्व जिल्ह्यांना केरोसिन नियतन मंजूर करण्यात येईल.
(४) हे खरे आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पोथरे( ता.करमाळ,जि.सोलापूर) येथील ग्रामस्थांना जलप्राधिकरण योजनेतून पाणीपूरवठा होत नसल्याबाबत

**(३३) २३८३६ (२९-०७-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोथरे (ता.करमाळा,जि.सोलापूर) येथे जलप्राधिकरण योजनेतून पाणी पुरवठा होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतून अर्ध्याहून अधिक गावास गेल्या तीन वर्षापासून पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत नागरिकांनी ग्रामपंचायत व पंचायत समिती तसेच पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार दिली असून लेखी तक्रार मिळूनही संबंधित विभागाकडून पाणी पुरवठा सुरळीत केला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०९-२०१५) :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे. योजनेतून पोथरे गावठाणात पाणी पुरवठा होतो. उर्वरित भागासाठी ग्रामपंचायतीने जलस्वराज्य ही स्वतंत्र योजना राबविली असून योजनेच्या उध्दभवास पाणी कमी आहे.
(३) नाही.

(४) पोथरे वाडी/वस्तीसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना कृती आराखडा सन २०१५-१६ मध्ये समावेश करण्यात आला आहे.
(५) केंद्र शासनाच्या दि.२९.०७.२०१५ च्या सूचनानुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या नविन कामानां स्थगिती देण्यात आली आहे.

---

**राज्यातील वापर झालेल्या पाण्याचा कमी खर्चात प्रक्रिया करुन पुनर्वापर करण्याबाबत**

**(३४) २३८७० (२९-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपुरा पाणीपुरवठा, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष पाहता वापर झालेल्या पाण्याचा कमी खर्चात प्रक्रिया करुन पुनर्वापर करण्याबाबत शासन विचार करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत तसेच राज्यात निर्माण होणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०८-२०१५) :** (१) नाही.
(२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दि. १७ मार्च, २०१० अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना पारित केल्या असून या शासन निर्णयातील तरतूदीनुसार पाणी पुरवठा योजना राबवितांना स्त्रोतांच्या (भूजलाधारित अथवा भूपृष्ठीय) कामाबरोबर स्त्रोतांच्या बळकटीकरणाच्या दृष्टीकोनातून भूजल पुनर्भरणाची कामे हाती घेण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दि. १४ फेब्रुवारी, २००२ अन्वये पिण्याच्या व घरगुती वापराच्या उपलब्धता वाढविणे व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करणे, यासाठी पावसाच्या पाण्याचा उपयोग करुन "शिवकालीन पाणी साठवण योजना" राज्यामध्ये राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) राज्यात निर्माण होणा-या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी या विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना घेण्यात येतात.
अ) नवीन विंधन विहिरी घेणे.
ब) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
क) विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती करणे.
ड) तात्पुरत्या पुरक नळ योजना घेणे.
इ) बुडक्या घेणे.
ई) विहिरी खोल करणे/गाळ काढणे.
उ) खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे.
ऊ) टँकर्स/बैलगाड्यांव्दारे पाणी पुरवठा करणे.

---

**कोचाई-बोरमाळ (ता.तलासरी,जि.पालघर) मध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३५) २४००१ (३१-०७-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोचाई-बोरमाळ (ता.तलासरी,जि.पालघर) येथे ग्रामीण पाणी पुरवठा योजनेत सन २००७-०८ मध्ये ५ टक्के लोकवर्गणीतून मंजूर विहिरींमध्ये लाखो रूपयांचा गैरव्यवहार झाला असून नागरिकांची पाण्यासाठी वणवण सुरु असल्याचे दि.१४ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही. तथापि, कोचाई-बोरमाळ येथील चार पाडयांना सन २००७-०८ मध्ये चार साध्या विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी तीन विहिरी पूर्ण करण्यात आल्या असून त्यातून पाणी पुरवठा सुरु आहे. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अंतर्गत वादामुळे अपूर्ण अवस्थेतील उर्वरित एका विहिरीचे काम प्रगतीत असून ते नोव्हेंबर, २०१५ अखरे पूर्ण करण्यात येईल.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रॉकेलचे दरही शासकीय नियंत्रणातून मुक्त करण्याचा प्रस्ताव**

**(३६) २४००९ (३१-०७-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पेट्रोल आणि डिझेल या इंधनाचे दर शासकीय नियंत्रणातून मुक्त करुन बाजारातील दराशी संलग्न केल्यानंतर रॉकेलचे दरही शासकीय नियंत्रणातून मुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०९-२०१५) :** (१) केरोसिनचे दर निश्चित करण्याची बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हुपरी (जि.कोल्हापूर) येथील पाणी योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे काम बंद असल्याबाबत

**(३७) २४६७३ (२९-०७-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हुपरी (जि.कोल्हापूर) येथील पाणी योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे काम माहे मार्च, २०१५ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत चौकशी करुन योजना पूर्ण करण्याकरिता जिल्हा परिषदेने सदर योजना ताब्यात घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) होय, तोंडी स्वरुपात मागणी केली आहे.

(३) व (४) टाकीचे जागेबाबत वाद निर्माण झाल्यामुळे सदर योजनेचे काम माहे मार्च, २०१५ पासून संथ गतीने सुरु आहे. वादाचे निराकरण झाल्यानंतर योजनेचे काम पूर्ण करुन जिल्हा परिषदेच्या ताब्यात देण्यात येईल.

---

### गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत तसेच मौ.कुरखेडा येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३८) २४८८३ (२९-०७-२०१५). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजनेंतर्गत पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या ग्रामपंचायत समितीने हस्तांतरीत केल्या आहेत काय,

(३) असल्यास, मौजा कुरखेडा येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून सदर बांधकामाची चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही ठिकाणी पाण्याच्या टाकीचे काम निष्कृट दर्जाचे झाले असून तर काही ठिकाणी काम पूर्ण होऊनही कार्यान्वित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

ज्या योजनांची कामे पूर्ण झाली आहेत त्या योजना ग्रामपंचायतने हस्तांतरीत केल्या आहेत.

(३) नाही.

कुरखेड येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले नसुन तशी चौकशीची मागणी नागरीकांनी केली नाही.

(४) हे खरे नाही.

मौजे कुरखेडा गावाचे रुपांतर नगर पंचायत मध्ये झाल्यामुळे सदर गावासाठी प्रशासकाची नेमणूक झाली आहे. त्यामुळे वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या नविन उद्भवावरुन पाणी पुरवठा सुरु करणेबाबत संबंधीत ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कुरखेडा यांनी प्रशासकांना प्रत्यक्ष भेटून सुचना केलेल्या असून याबाबत जिल्हा परिषद, कुरखेडा यांच्याकडून पाठपुरावा सुरु आहे.

सद्य:स्थितीत मौजा कुरखेडा येथे अस्तीत्वातील जुन्या उद्भवावरुन कुरखेडा नगर पंचायत मार्फत सादर गावासाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) येथील पाणी योजनेच्या कामाबाबत**

**(३९) २४८९८ (२९-०७-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडूस (ता.वाडा,जि.पालघर) ग्रामपंचायतीला पाणी पुरवठा योजनेसाठी सन २०१४-१५ साठी ४ कोटी ५६ लाख ८५ हजार ९९६ रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठा योजनेची कामे सुरु करताना कामासाठी लागणारी जमीन ग्रामपंचायतीच्या नावे अधिग्रहण न करता अथवा जागा मालकाचे संमतीपत्रक न घेताच कामे सुरु करण्यात आल्याने जागा मालकांनी हरकती घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त पाणी पुरवठा योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०८-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचयातीला पाणी योजनेसाठी सन २०१४-१५ मध्ये रुपये २४५.७९ लाख निधी प्राप्त झाला आहे.

(२) होय, हे खरे आहे. ग्रामपंचयात कुडूस गट क्र.३८५ येथे टाकीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर हरकत घेतल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. तसेच उर्वरित ३ जागांचे बक्षिसपत्र प्राप्त असून एका जागेवर जलकुंभाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित २ ठिकाणी पावसाळयानंतर जागेची

खात्री करुन काम पूर्ण करण्यात येईल.

(३) होय, चौकशी सुरु असून ग्रामपंचायत कुडूस द्वारे उपस्थित हरकती बद्दल योग्य तो पत्र व्यवहार करुन जागा मोजणीची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेकनानपूर (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील नागरिकांना पाणीपुरवठा होण्याबाबत**

**(४०) २५३९८ (२९-०७-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगाव ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या नेकनानपूर (ता.चांदूर रेल्वे,जि.अमरावती) येथील नागरिकांना पाणीपुरवठा व्हावा यासाठी पाईपलाईन टाकण्यात आली मात्र दोन वर्षापासून येथील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळाले नसल्याने पाण्यासाठी भटकंती होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षापासून प्रलंबित असलेला पाणीपुरवठा कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०९-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) सोनगाव ग्रामपंचायतीने विद्युत वितरण कंपनीकडे दि.३०.०३.२०१५ ला विद्युत पुरवठा मागणीची रक्कम रु.१५७०/- भरणा केल्यानंतर विद्युत कंपनीने दि.०१.०८.२०१५ रोजी विद्युत मिटर बसवून विद्युत पुरवठा सुरु केला. दि. ०५.०८.२०१५ पासून नेकनानपूर येथे पाणी पुरवठा सुरु केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मोडनिंब (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील प्रादेशिक नळपाणी पुरवठा बंद असल्याबाबत**

**(४१) २६२०८ (२९-०७-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोडनिंब (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील प्रादेशिक नळपाणी पुरवठा माहे फेब्रुवारी, २०१५ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर गावातील नागरिकांची पाण्याअभावी गैरसोय होवू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०९-२०१५)** :(१) होय, अंशत: खरे आहे.
(२) मोडनिंब गावासाठी सन १९९७ मध्ये स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना कार्यन्वित करण्यात आली आहे. या नळ पाणी पुरवठा योजनेची दाबनलिका वारंवार नादुरुस्त होत असल्याने तसेच माहे एप्रिल, २०१५ मध्ये ग्रामपंचायतीने विद्युत बिलाची थकबाकी न भरल्यामुळे म.रा.वि.वि. कंपनीने विद्युत पुरवठा बंद केल्यामुळे, नळ पाणी पुरवठा खंडित झालेला होता.
(३) मोडनिंब गावासाठी नविन पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली असून सदर नविन योजनेचे पंप व दाब नलिकेचे काम पूर्ण होऊन पाणी पुरवठा सुरु केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील चांधई व पिंपळोली येथील**
**पाणी योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) २६६३२ (२९-०७-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील रायगड ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत चांधई पाणी योजनेवर सुमारे रूपये ३८ लाखांचा खर्च करण्यात येवून सुध्दा सदर योजनेचे काम गत ६ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच अंथ्रट (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत पिंपळोली येथे राज्य शासनाच्या पाणी पुरवठा विभागाने सुगवे नळपाणी योजनेतून पंधरा वर्षापूर्वी टाकलेल्या जलवाहिनीतून पाणी येत नसल्यामुळे पाच किलोमीटर अंतरावरील उल्हास नदीवर खड्डे खणून पिण्याचे पाणी आणण्यासाठी उक्त परिसरातील महिलांना जावे लागत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दरवर्षी पाणी टंचाईमुळे उक्त नदीवर खड्डे खोदून दुषित पाणी प्यायल्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त पाणी योजनेचे काम पूर्ण क्षमतेने करण्याबाबत व प्रश्न भाग (२) मधील नळ पाणी योजना सुरळीत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) (१) चांधई नळ पाणी पुरवठा योजनेतील ९०% उपांगे पूर्ण झाली आहत. उर्वरित किरकोळ कामे पूर्ण करुन योजना नोव्हेंबर, २०१५ अखेर पूर्ण करणेत येईल.
(२) आंत्राट-तर्फे-वरेडी योजनेचा राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम सन २०१५-१६ च वार्षिक कृती

आराखड्यात समावेश केला आहे. योजनेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सन २०१५-१६ कृती आराखडा मंजूर झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगाव (जि.वाशिम) येथे नाबार्डच्या अर्थसहाय्याने ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्याबाबत

**(४३) २६६६५ (२९-०७-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.वाशिम) येथे नाबार्डच्या अर्थसहाय्याने ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापनासाठी ग्रामीण पायाभूत विकास निधी-१९ अंतर्गत दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये रूपये ३१४.९४ लाखाचे कामास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण करण्याचा कार्यक्रम असताना अद्यापही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिका-यांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली व सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे,
(२), (३) व (४) मालेगांव (जि.वाशिम) सह राज्यातील एकूण २८ गांवात नाबार्डच्या अर्थसहाय्याने ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापन योजना राबविण्यास शासन निर्णय दि.१४ ऑगस्ट, २०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर प्रकल्प दि.३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मालेगांव (जि.वाशिम) येथील योजनेच्या प्रत्यक्ष कामास दि.१७ एप्रिल, २०१५ पासून सुरुवात झाली असून सद्य:स्थितीत सदर योजनेतील कामांची भौतिक प्रगती ३५ टक्के पूर्ण झाली आहे.

---

## काबरानगर (जि.नांदेड) परिसरात वाडी वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामावरील कामगाराचा वीजेच्या धक्क्याने झालेला मृत्यू

**(४४) २६७७६ (२९-०७-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काबरानगर (जि.नांदेड) परिसरात असलेल्या जलशुध्दीकरण केंद्राजवळ वाडी वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामावरील एका कामगाराचा दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास वीजेच्या धक्क्याने मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर मृत्यु कामगारांच्या कुटुंबियांना कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०९-२०१२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वाडी (बु) पाणी पुरवठा योजना, जि. नांदेड या योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दिलेल्या कार्यादेशान्वये मे.प्रगती कन्स्ट्रक्शन चाकूर यांच्यामार्फत सुरु करण्यात आले. सदर मयत कामगार हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा कर्मचारी नसून तो.मे.प्रगती कन्स्ट्रक्शन, चाकूर यांचा कर्मचारी होता. मे.प्रगती कन्स्ट्रक्शन चाकूर यांच्यामार्फत विमा संचालनालयाकडे मृत कामगाराच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारड (ता.मुदखेड,जि.नांदेड) येथील अनेक लाभार्थ्यांना शौचालय बांधकामाचे अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(४५) २६७८८ (२९-०७-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारड (ता.मुदखेड,जि.नांदेड) ग्रामपंचायत हद्दीतील अनेक लाभार्थ्यांना शौचालय बांधकामाचे अनुदान माहे एप्रिल, २०१५ पर्यंत मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे अनुदान अद्यापपर्यंत न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरचे अनुदान तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विविध कार्यालयांतील पर्यावरण विषयक परवानग्या मिळविण्यासाठीची माहिती ऑनलाईन उपलब्ध होणे बाबत**

**(४६) २६९५९ (३१-०७-२०१५). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या राज्यातील विविध कार्यालयांत सामान्य नागरिकांना पर्यावरण विषयक परवानग्या घेण्यासाठी सातत्याने समक्ष जावे लागते व त्याबाबतचे हेलपाटे टाळण्याच्या दृष्टीने संबंधीत व्यक्ती खाजगी दलालांचा वापर करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामान्य नागरिकांचा त्रास टाळण्याच्या दृष्टीने व खाजगी दलालांना प्रतिबंध

करण्याच्या दृष्टीने परवानग्या मिळविण्याबाबतची व्यवस्था ऑनलाईन करण्याबाबत शासनाचे धोरण आहे काय,
(३) असल्यास, सदरहू धोरण केव्हा अंमलात आले आहे, वा कधी येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०४-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) पर्यावरण विषयक परवानग्या ऑनलाईन करण्याबाबतचे धोरण महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण, मंडळामध्ये माहे सप्टेंबर, २०१५ पासून अंमलात घेणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा बारु (ता.धारणी, जि.अमरावती) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत नविन विहिरीसाठी असलेला मंजूर निधी वापरला जात नसल्याबाबत**

**(४७) २७०७५ (२९-०७-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा बारु (ता.धारणी,जि.अमरावती) येथे पिण्याच्या पाण्याची भीषण परिस्थिती लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत नविन विहिरीसाठी निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन विहिरीसाठी निधी वापरला जात नसून जुन्याच विहिरीचे खोदकाम करण्यात येत आहे, कार्यकारी अभियंता व ठेकेदार यांच्या परवानगीनेच जुन्या विहिरींचे खोदकाम चालू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
मौजे बारु, (ता.धारणी जि. अमरावती) या गावाकरीता राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत जुन्या पाणी पुरवठा योजनेच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.
(२) भूजल विभागाच्या प्रमाणपत्रानुसार व मंजूर योजनेनुसार, अस्तित्वातील विहिरीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात आले आहे. तसेच विहिरीचे बांधकाम करण्याअगोदर सहायक भुवैज्ञानिकामार्फत विहिरीतील पाण्याची आवक चाचणी (yield test) घेण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुळजापूर(जि.उस्मानाबाद) विधानसभा मतदार संघातील अपूर्ण व निकृष्ट दर्जाच्या पाणी पुरवठा योजनांबाबत**

**(४८) २७१३३ (२९-०७-२०१५). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) विधानसभा मतदार संघातील सन २००३ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेल्या पाणी पुरवठा योजना अद्याप अपूर्णावस्थेत आहेत तसेच सन २००९ मध्ये केलेल्या योजना निकृष्ट आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुका तसेच वसई-विरार मनपा हद्दीतील सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय स्थापित करणेबाबत.**

**(४९) २७३४० (३१-०७-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुका तसेच वसई-विरार मनपा हद्दीतील सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय स्थापित करण्याची विनंती सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक ह्यांचेकडे दिनांक ६ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पालघर ह्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई तालुका मुंबई शहरालगतच असल्याने सदर तालुक्यात मुंबई, इतर जिल्हे तथा परराज्यातुन बहुसंख्येने कुटुंब येथे वास्तव्यास येत आहेत सन २०११ च्या जनगणने प्रमाणे १३.५० लक्ष इतकी लोकसंख्या असुन सन २०१५ च्या अखेरपर्यंत २० लाखाच्या आसपास जाऊ शकते ह्याची शासन दखल घेणार आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक वितरण प्रणालीमधील विविध प्रकारच्या कामांसाठी इतक्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या तालुक्यात कर्मचारी वर्ग प्रचंड अपुरा पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०३-०९-२०१५) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी, पालघर यांनी सादर केलेला प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

**नवनिर्मित पालघर जिल्ह्याची पुरवठा विभागाची वर्ग-३**
**व वर्ग-४ ची पदे मंजूर करणेबाबत**

**(५०) २७३५८ (३१-०७-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील पुरवठा विभागाची वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे रिक्त असल्याने अपु-या कर्मचारी वर्गामुळे जिल्ह्याचा पुरवठा विभाग पूर्णतः विस्कळीत झाला असून सदर रिक्त पदे मंजूर करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर ह्यांनी सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ह्यांचेकडे दि.५ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिका-यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, रिक्त पदास मंजूरी देण्यास अद्याप किती कालावधी अपेक्षित आहे?

**श्री. गिरीश बापट (०३-०९-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) अविभाजित ठाणे जिल्ह्यात पुरवठा विभागासाठी मंजूर असलेल्या गट-क व गट-ड मधील एकूण ४९ पदांचे कामाच्या प्रमाणात वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक २४ जून, २०१५ च्या शासन आदेशान्वये पालघर जिल्ह्यासाठी गट-क व गट-ड च्या एकूण ३८ पदांचे वाटप करण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.